# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ४५ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०४ चैत्र शके १९४८, बुधवार दि.२५ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## महिलांनो, ढोंगी बुवाबाजीपासून सावध रहा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

अशोक खरात प्रकरणाने परत एकदा स्त्रियांच्या अंधश्रद्धेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. खरात सारख्या पिसाटाणे अनेक महिलांचे शारीरिक व लैंगिक शोषण केल्याने अख्ख्या महाराष्ट्रात खळबळ निर्माण झाली आहे. प्रश्न हा आहे की महिला बाबांच्या मागे का लागतात? ढोंगी साधू, बुवाबाजी करणाऱ्यांच्या नादी बायका का लागतात?

अध्यात्म, अंधश्रद्धा, कौटुंबिक अडचणी, आजारपण किंवा भावनिक आधाराच्या शोधात काही महिला बाबा किंवा भोंदू बाबांच्या अमिषांना बळी पडतात. अनेकदा चुकीचे सल्ले, जादूटोणा किंवा लैंगिक शोषणाचे आमिष दाखवून भोंदू बाबा महिलांना जाळ्यात ओढतात, ज्यामुळे फसवणुकीचे प्रकार घडतात.

अंधश्रद्धा, अज्ञान, कुटुंबातील कलह, आजारपण किंवा संकटे दूर करण्यासाठी अनेकजण अशा बाबांकडे जातात.

भावनात्मक कमकुवतपणा, आयुष्यातील कठीण परिस्थितीत आधार हवा असतो, ज्याचा गैरफायदा हे भोंदू लोक घेतात. अनेक भोंदू बाबा अध्यात्माच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करतात, असे नाशिकमधील अशोक खरात प्रकरणात समोर आले आहे. चमत्कार दाखवून किंवा भीती घालून महिलांना आकर्षित केले जाते. कुटुंबातील पुरुषांच्या हव्यासापायी महिलांना अनेकदा अशा अंधश्रद्धेच्या मार्गावर पाठवले जाते, ज्यात बऱ्याचदा हुंड्यासाठी पिळवणूकही असते.

महिलांनी ढोंगी आणि दांभिक लोकांपासून सावध राहिले पाहिजे. हे लोक अनेकदा लोकांच्या अडचणी, आजार किंवा कौटुंबिक समस्यांचा गैरफायदा घेऊन त्यांना आपल्या जाळ्यात ओढतात.

ढोंगी साधू नवनवीन तंत्राचा अवलंब करून पीडितांना वश करण्याचा प्रयत्न करतात. ते अनेकदा गर्भधारणा होण्यास मदत करणे, आजार बरे करणे किंवा भूतबाधा उतरवण्याच्या नावाखाली एकट्या स्त्रियांना बोलावतात. ग्रहांची स्थिती वाईट आहे किंवा कुटुंबावर वाईट नजर आहे अशी भीती दाखवून ते स्त्रियांचे पैसे आणि दागिने लुटतात.

तंत्र-मंत्राच्या नावाखाली अश्लील वर्तन, गुंगीचे औषध देणे किंवा शारीरिक छळ ही त्यांची मुख्य शस्त्रे आहेत.

स्त्रियांनी अंधश्रद्धेपासून दूर राहून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे, कारण अंधश्रद्धेमुळे त्यांचे मानसिक, आर्थिक व शारीरिक शोषण होऊन समाजाचा विकास खुंटतो. रुढी-परंपरांच्या नावाखाली होणारी फसवणूक टाळण्यासाठी महिलांनी सक्षम व जागृत होणे काळाची गरज आहे.महिला प्रामुख्याने सामाजिक दबाव, शिक्षणाचा अभाव, पुरुषप्रधान विचारसरणी आणि असुरक्षिततेमुळे अंधश्रद्धा स्वीकारतात. शतकानुशतके चालत आलेले रूढीवादी विचार, भीती आणि आर्थिक व मानसिक परावलंबित्व त्यांना या प्रथांचे पालन करण्यास भाग पाडतात.

पितृसत्ताक समाजात, स्त्रियांना अनेकदा पुरुषप्रधान नियमांचे पालन करण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे अंधश्रद्धा टिकून राहतात. ऐतिहासिकदृष्ट्या शिक्षणापासून वंचित असल्यामुळे, स्त्रिया रूढ समजुतींनाच सत्य मानतात.

भविष्याबद्दलची असुरक्षितता, भीती आणि अनिश्चिततेमुळे, त्या सुरक्षिततेच्या आणि चांगल्या भविष्याच्या आशेने अंधश्रद्धांचा आधार घेतात.

पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या परंपरा, मांत्रिक आणि अंधश्रद्धेमुळे अंधश्रद्धा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होतात पुरुषांवरील आर्थिक अवलंबित्वमुळे, स्त्रियांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य कमी मिळते, ज्यामुळे त्यांना रूढ परंपरांचे पालन करण्यास भाग पाडले जाते.

मासिक पाळीच्या काळात अपवित्रतेची भावना आणि स्त्रियांना समाजापासून वेगळे पाडणाऱ्या परंपरांमुळेही अंधश्रद्धांना प्रोत्साहन मिळते.

या हानिकारक प्रथा दूर करण्यासाठी शिक्षण आणि जागृती अत्यंत महत्त्वाची आहे, जेणेकरून स्त्रिया तर्कशुद्धपणे विचार करू शकतील.

भोंदू बाबांपासून महिलांनी अधिक सावध रहावे. चमत्कार करणारा असल्याचा दावा करणाऱ्या कोणालाही एकटे किंवा निर्जन ठिकाणी भेटणे टाळा. तुमच्या समस्यांसाठी बाबांऐवजी डॉक्टर किंवा तज्ज्ञांचा सल्ला घ्या. वैयक्तिक बाबी सांगू नका, तुमच्यातील कमकुवतपणा किंवा कौटुंबिक वाद कोणत्याही अनोळखी बाबाला सांगू नका, कारण ते याचा गैरफायदा घेतात.

जर एखादा बाबा धमकावण्याचा किंवा अयोग्यरित्या स्पर्श करण्याचा प्रयत्न करत असेल, तर तात्काळ आरडाओरडा करा आणि पोलिसांत तक्रार दाखल करा. महिला हेल्पलाइन (१०९१) वर देखील संपर्क साधता येतो.

९५६१५९४३०६

## हिंदू आध्यात्मिक परंपरेमुळेच भारतात शांतता-डॉ. संकेत देशमुख




ज्योतिर्मय साहित्य

धायरी: ''जगातील अनेक राष्ट्रांमध्ये सध्या युद्धजन्य परिस्थिती असली, तरी भारतामध्ये मात्र आपली महान आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक सद्भाव यांमुळे शांतता टिकून आहे,'' असे प्रतिपादन प्रमुख वक्ते डॉ. संकेत देशमुख यांनी केले. धायरी येथील उंबऱ्या गणपती वस्ती हिंदू संमेलन समितीच्या वतीने आयोजित हिंदू संमेलनात ते बोलत होते.

पवन मेडिकलजवळील पुणे महानगरपालिकेच्या मैदानावर रविवारी (२२ मार्च) सायंकाळी हे भव्य संमेलन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद इतिहासतज्ज्ञ डॉ. रमेश कांबळे यांनी भूषविले. यावेळी हिंदू जागरणाच्या १०० वर्षांची संघयात्रा या सांस्कृतिक वार्तापत्राच्या विशेष अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. देशमुख पुढे म्हणाले की, ''पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण थांबवून आपण आपले हिंदू सण अभिमानाने साजरे केले पाहिजेत. ३१ डिसेंबरऐवजी गुढीपाडवा हाच आपला खरा नववर्षारंभ दिन आहे. हिंदू हा केवळ धर्म नसून तो एक विचार आणि समृद्ध संस्कृती आहे.'' यावेळी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचा इतिहास आणि शंभर वर्षांतील सेवाकार्याचा आढावा घेत उपस्थितांना आपली आत्मशक्ती जागृत करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. रमेश कांबळे म्हणाले की, ''छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदू राष्ट्रासाठी जगले आणि त्यांनी आपल्या संस्कृतीचे जतन केले. जगा आणि जगू द्या हे आपले वैशिष्ट्य आहे, वैगुण्य नव्हे. शिवरायांचा हाच गौरवशाली इतिहास आजही आपल्याला प्रेरणा देतो.'' मातृशक्तीच्या प्रतिनिधी सौ. केतकीताई पांडे यांनी सणांच्या माध्यमातून संस्कृतीची ओळख जपण्याचे आणि पंचपरिवर्तन बिंदूंद्वारे समाजात बदल घडवण्याचे आवाहन केले. श्री. पुरुषोत्तम महाराज कुलकर्णी यांनीही हिंदू धर्माचे महत्त्व विषद केले.

**लाठीकाठीच्या प्रात्यक्षिकांनी वेधले लक्ष :**

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात छत्रपती ताराराणी विकास मंचाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या लाठीकाठीच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. संमेलनस्थळी भाविसा साहित्य विक्री आणि गोसेवा उत्पादनांचे स्टॉल्सही लावण्यात आले होते. या प्रसंगी श्री. यशवंतबापू लायगुडे, श्री. गंगाधरजी भडावळे, श्री. विनायकराव खाडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सौ. माधवी देशपांडे व सौ. वैशाली देशमुख यांच्या दुर्गास्तोत्राने झाली. कु. ईशानी रानवडकर हिने वैयक्तिक गीत सादर केले. सूत्रसंचालन श्री. संकेत खळदकर यांनी, तर आभारप्रदर्शन श्री. श्रीपाद कानडे यांनी केले. सौ. प्रियांका मालशे यांनी गायलेल्या पूर्ण वंदे मातरम्ने आणि प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. या संमेलनास धायरी परिसरातील सुमारे ६०० नागरिक उपस्थित होते.

## नाट्य कलावंत पौर्णिमा तायडे सन्मानित



ज्योतिर्मय साहित्य

गोंडपिपरी : युगचेतना ग्राम विकास बहुद्देशीय संस्था चंद्रपूर तथा महाराष्ट्र राज्य मानव अत्याचार निर्मूलन समिती गोंडपिपरी यांच्या संयुक्त विद्यमाने धाबा येथे २२ मार्चला आयोजित झाडीपट्टी कलावंतांचे स्नेहसंमेलन, सत्कार तथा समाजप्रबोधन कार्यक्रमात झाडीपट्टी रंगभूमीवरील अष्टपैलू कलावंत अभिनेत्री पौर्णिमा तायडे यांना ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ.परशुराम खुणे यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाट्य अभ्यासक डॉ. राजकुमार मुसणे, ज्येष्ठ नाट्य कलावंत अरविंद झाडे, अमित अलोने, ज्येष्ठ रंगकर्मी हिरालाल पेंटर, प्रकाश तोहगावकर, श्री. पिपरे, भूमालाताई कुमरे, माजी सरपंच रामदास पिपरे, दीपक सोनारकर, प्रमोद झाडे आदी मान्यवर उपस्थित होते. मागील वीस वर्षांपासून हौशी, व्यावसायिक व प्रायोगिक रंगभूमीवरील अभिनयाने प्रेक्षकांचे रंजन व प्रबोधन करणाऱ्या कलावंतांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. पोर्णिमा तायडे यांनी चरित्रपर, विनोदी, खलनायक अशा विविधांगी भूमिका आकर्षक व्यक्तिमत्व, प्रभावी संवादफेक व आंगिक अभिनयाच्या वैशिष्ट्यपूर्ण कौशल्याने आपल्या चतुरस्त्र अभिनयाने साकारल्या आहेत. उत्कृष्ट नाट्य कलावंत म्हणून नाव लौकिक प्राप्त पौर्णिमा तायडे यांचा सन्मान झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## ताडपिंपळगावच्या सागर सोनवणे यांना यंग ॲग्री-इन्स्पिरेटर अवॉर्ड २०२५ जाहीर



ज्योतिर्मय साहित्य

कन्नड – शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून क्रांती घडवणाऱ्या कन्नड तालुक्यातील ताडपिंपळगाव येथील युवा उद्योजक आणि प्रगतशील शेतकरी सागर राजेंद्र सोनवणे यांना तिफण फाउंडेशनतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठित यंग ॲग्री-इन्स्पिरेटर अवॉर्ड २०२५ जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शाश्वत शेतीचा नवा आदर्श:

सागर सोनवणे यांनी बी.एस्सी. ॲग्रीकल्चर पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या मागे न धावता मायभूमीत राहून शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्थापन केलेल्या सक्सेस ॲग्रो या संस्थेच्या माध्यमातून ते हजारो शेतकऱ्यांना जैविक खते, कीड नियंत्रण आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन करत आहेत. विशेषतः ट्रायकोडर्मा, मायकोरायझा आणि एनपीके बॅक्टेरिया यांसारख्या जैविक घटकांचा प्रसार करून त्यांनी शाश्वत शेतीचा एक नवा पायंडा रचला आहे.

युवा पिढीसाठी प्रेरणास्थान:

सागर यांनी आजवर शेती, मधमाशी पालन आणि सर्पविज्ञानावर ५० हून अधिक लेख लिहिले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन तिफण फाउंडेशनने त्यांची या गौरवपूर्ण पुरस्कारासाठी निवड केली आहे. नुकतीच प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख साहेब यांनीही सागर सोनवणे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले होते.

या पुरस्कारामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सागर यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, लवकरच एका दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## क्रांतिकारकांचे धैर्य, त्याग, राष्ट्रनिष्ठा अनुकरणीय-डॉ. शेषराव पठाडे



ज्योतिर्मय साहित्य


छत्रपती संभाजीनगर – युवकांनी ग्रंथालयात बसून पुस्तकातून शहिदांच्या जीवनकार्याचा अभ्यास करावा. क्रांतिकारकांच्या विचारसरणीचा आणि त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढताना दाखविलेले धैर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठा अनुकरणीय असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेषराव पठाडे यांनी सोमवारी, २३ रोजी येथे केले. अध्यक्षस्थानी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव होते.

शहीद दिनानिमित्त शासकीय विभागीय ग्रंथालयात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना डॉ. शेषराव पठाडे यांच्यासह ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ. पठाडे शहीद दिनाचे महत्त्व अधोरेखित करताना म्हणाले, देशाच्या प्रगतीसाठी, राष्ट्राच्या हितासाठी प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. युवा पिढीने शिक्षण घेत असताना राष्ट्रहिताचे भान ठेवून समाजासाठी कार्य करणे आवश्यक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी क्रांतिकारकांनी दिलेले बलिदान विसरता कामा नये असे सांगून देशभक्तीची भावना जपण्याचे आवाहन केले.

प्रारंभी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी डॉ. शेषराव पठाडे यांचे स्वागत केले. राठोड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, तर बोलकर यांनी आभारप्रदर्शन केले. याप्रसंगी ग्रंथालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# जात्यावरच्या ओव्या......

मन दगडाला पाझर
रडु लागे मुळूमुळू
ओल नात्याची लागत
वाहु लागल झुळझुळू ||५५८||

मन ठवळ ठवळ
जणू कापसाच बोंड
मन काजळ काळ
ह्यान रंगवल तोंड ||५५९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ११




ज्योतिर्मय साहित्य

माझे प्रेम नेमके कशावर आहे - नश्वर गोष्टींवर की चिरंतन तत्त्वावर?

एखादे दुःख आले की मी त्याचा बाऊ करतो, की शांतपणे स्वीकारून पुढे चालतो?

माझ्या देहाच्या त्रासाशी मी पूर्णपणे एकरूप होतो का, की मी त्याचा साक्षी राहू शकतो?

विवेकबुद्धी वापरून मी परिस्थिती आणि प्रतिक्रिया यांमध्ये फरक करू शकतो का?

माझे मन नामस्मरणात किंवा आत्मचिंतनात किती वेळ रमते ?
( क्रमशः )


जनी सर्वसुखी असा कोण आहे ?
विचारे मना तूचि शोधूनि पाहे।
मना त्वां चि रे पूर्वसंचित केले।
तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ।११।




अर्थ : हे मना तू बारकाईने निरीक्षण कर आणि हे शोधण्याचा प्रयत्न करू की जगामध्ये संपूर्णतः सुखी अशी कोणी व्यक्ती आहे का ? प्रत्येक माणूस आपल्या मागील जन्मांमध्ये चांगली वाईट कृत्ये करतो. त्यांचे पूर्वसंचित त्याच्याजवळ जमा झालेले असते आणि त्यानुसारच त्याला या जन्मात सुखदुःखे भोगावी लागतात.

आधीच्या श्लोकात समर्थ म्हणतात देहेदुःख ते सुख मानीत जावे. परंतु हे एकदम होत नाही. त्यासाठी मनोभूमिका तयार करावी लागते. ती मनोभूमिका तयार करण्याचे काम समर्थ या श्लोकात करतात. जो जन्माला आला, त्याला सुखदुःख भोगणे क्रमप्राप्त आहे. कोणाचीच त्यापासून सुटका नाही. कदाचित सुखदुःखाचे प्रमाण कमी जास्त असेल परंतु प्रत्येकाला ते भोगावेच लागतात. असे म्हणून चालत नाही की माझ्याच वाट्याला एवढे दुःख का ?

म्हणून समर्थ मनाला (म्हणजे आपल्याला)उपदेश करताना म्हणतात,'' जरा आजूबाजूला पहा. उघड्या डोळ्यांनी शोध घे. म्हणजे तुझ्या लक्षात येईल की जगात सर्व सुखी म्हणजे सुखाने परिपूर्ण अशी कोणीही व्यक्ती नाही.'' लग्न करणाराही दुःखी असतो आणि लग्न न करणारा देखील ! ज्याला संतती नाही तो तर दुःखी असतोच परंतु ज्याला संतती आहे आणि ती संतती जर कुलक्षणी निघाली तर तो त्यापेक्षाही जास्त दुःखी असतो. एखाद्या श्रीमंताकडे सगळे वैभव असते परंतु संतती नसते. एखाद्याकडे अमाप पैसा असतो परंतु आरोग्याची देणगी नसते. परंतु माणसाला नेहमी दुसऱ्याचे चांगले दिसते आणि माझ्या वाटेला आलेले तेवढे वाईट असे वाटते. आपण परदुःख शीतल असे म्हणतो त्याचा अर्थ हाच ! (क्रमशः)



# नाम निष्ठेने घ्यावे.

## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम श्रद्धेने घेणे म्हणजे काय ? तर आपल्या गुरूने, किंवा ज्याच्याबद्दल आपली पूज्य भावना असते अशा व्यक्तीने, सांगितले म्हणून घेणे. अशा श्रद्धेने नाम घेणाऱ्याच्या मनात शंका येत नाही. ही स्थिती फार भाग्याची, पण तितकीच दुर्मिळ. निष्ठेने नाम घेणे म्हणजे शंकारहित नाम घेणे. शंका अनेक तऱ्हेच्या असतात. नाम घेताना भगवंताकडे लक्ष नसले तर त्या नामाचा उपयोग आहे की नाही, नाम घेताना बैठक कोणती असावी, दृष्टी कशी असावी, शुचिर्भूतपणेच नाम घ्यावे किंवा कसे, अशा तऱ्हेच्या अनेक शंका मनात येतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, आपण जे नाम घेतो ते भगवंतापर्यंत पोहोचते की नाही, ह्या एका शंकेत सर्व शंकांचा समावेश होतो. भगवंत आणि त्याचे नाम एकरूपच असल्याने त्या दोहोंच्या आड काहीच येऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागून आपण चाललो असताना आपल्या तोंडून त्याचे नाव उच्चारले गेले तर तो लगेच मागे वळून बघतो. ही जर मनुष्याची स्थिती, तर भगवंताच्या बाबतीत त्याचे नाव त्याच्यापर्यंत पोहोचत नाही हे कसे शक्य आहे ? खरे पाहिले तर भगवंताचे नाव त्याच्याच कृपेने आपल्या मुखात येते; म्हणजे त्याचे नाव तोच घेत असतो; मग नाम भगवंतापर्यंत पोहोचते की नाही ह्या शंकेला वावच कोठे राहिला ? समजा, दोन माणसे जेवायला बसली. त्यांतल्या एकाच्या मनात काही विचार घोळत असून त्याचे जेवणाकडे लक्ष नव्हते, पण हाताने तोंडात एकेक घास घालण्याचे काम चालू होते. दुसरा इसम मात्र लक्षपूर्वक जेवण जेवीत होता. दोघेही जेवून उठले. ह्यात उपाशी कोण राहिला ? दोघांचीही पोटे भरलीच ! तसे, नाम घेतल्यानंतर त्याचा उपयोग झाला नाही असे कसे होईल?


समजा, आपण परगावच्या एका अनोळखी इसमाला पत्र लिहून त्याला बोलाविले; तो आला, आणि त्याने सांगितले की, 'तुम्ही ज्याला पत्र पाठविले तोच मी', तर त्याच्या वचनावर विश्वास ठेवून आपण त्याला जवळ करतो. तसे, भगवंताने सांगितले आहे की, 'जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम'; तर मग या वचनावर विश्वास ठेवून नाम घ्यावे आणि त्यातच त्याला पहावे, असे का करता येऊ नये ? हीच श्रद्धा. आपण ज्याचे पोटी जन्माला आलो त्याचेच नाव आपण आपल्या नावापुढे लावतो, तसे भगवंताच्या बाबतीत करावे. त्याचेच नावाने जगावे; म्हणजे माझा सर्व कर्ता, रक्षिता, तो एकच असून, त्याच्याशिवाय माझे या जगात दुसरे कोणीही नाही, या भावनेने राहावे. असा जो भगवंताचा होतो, त्याचे महत्त्व भगवंत स्वत:पेक्षाही जास्त वाढवतो.

नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी. अशा नामालाच ' निष्ठेचे नाम ' असे म्हणतात.

# श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे.....
जग प्रकृती पासून झाल्याचे मानले तर त्याचा विलय पुन्हा प्रकृतीत होतो काय ? नाही तर नाही ते परमात्म्यातच विलीन होते. म्हणून जग हे परमात्म्या पासून झाले, असे वेदांताचा सिद्धांत आहे.
पाण्यावर निर्माण होणारे तरंग, बुडबुडे हे शेवटी पाणीच असते. याला विवर्त वाद म्हणतात.
सोने व अलंकार हे याचेच उदा. आहे. दागिने वितळविले तर पहिले रुप जाऊन त्याचे सोनेच होते. कारणात झालेला नाम रूपातील बदल ह्याला कार्य म्हणतात.
अग्नीमुखी किडाळ तोडोनिया । साखरेचा केला गोडवा
तुका म्हणे ऐसा अनुभव देव पाहिला डोळां ॥
सोनार सोन्याचा दागिना बनविताना त्यात थोडे तांबे मिसळवितो. दागिना मोडताना तांबे काढून सोन्याचे दाम दिल्या जातात.
आपण जगाच्या आकारात अडकलेलो असतो संत त्याच्या उपादान कारणात (त्याच्या मूळ कारणात) अडकून जातो.परमात्माच हे जग रूपाने नटला आहे. पहिल्या स्कंदचा विचार करताना विशिष्ठ मांडणी एकूण 19 अध्याय आहेत. यातील पहिले 3 अध्याय शुक शौनक संवाद, दुसरे 3 नारद संवाद.
आम्ही कथा ऐकण्यासाठी बसलो तर थोडा का होईना त्याचा चागला परिणाम प्रत्येक वेळी आपल्या मनावर झाला पाहिजे.
1000 वर्षे चालणारा यज्ञ शौनकदिकांनी सुरू केला. हा यज्ञ सुरू असताना जे विचार मंथन या ऋषी दरम्यान झाले ते या अध्यायात आले आहे.
या यज्ञाच्या 3 अध्यायाला अधिकार म्हणतात.
जिथवर परिक्षीत शाप ग्रस्त झाल्यावर परब्रम्ह स्वरूप येत नाही म्हणून गंगा किनारी आला. आता हा देह त्याग करावा या विचारा पर्यंत आला. तिथे शुक मुनी आले. याला स्वरूप अधिकार म्हणतात.
क्रमशः.......




## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# देहांन्तनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

देहांन्तनीरूपणाच्या समासात आतापर्यंत साधकाला आत्मज्ञान झाले असे समजू. परमार्थ मार्गात माणसाच्या अंतकाळास महत्व असते.

आपल्या मनात दृश्याचे प्रेम खूप खोलवर गेले आहे.

कारण जो मनुष्य संतांच्या संगतीत राहून संतांचे आचार विचार त्यांच्या शिकवणीचा आपल्या नित्याच्या व्यवहारातील कर्म साधना करत असताना संतांच्या विचारांचे सतत स्मरण करून निजध्यास घेतो. प्रत्येक श्वास सदुरूंचा आदेश म्हणून स्विकार करतो.

जीवन जगत असताना प्रत्येक वेळी चढउतार हे होत असतात. पण सद्गुरु पाठीशी आहे का असताना विचलीत न होता जो जे जे कर्म दिले आहे ते ते कर्म आनंदाने करतो तो खरा भक्त तो खरा साधक होय. संतांची संगत करतो, पुष्कळ श्रवण वाचन करतो, थोडीफार साधना करतो, एवढे करूनही मन दृष्याच्या अहंतेतून बाहेर पडत नाही.

दृष्य खरे नाही किंवा कितीही श्रवण केले तरी अंतरर्यामी प्रचिती येत नाही.स्वस्वरूपाचे दर्शन हे आपल ध्येय आहे.

स्वस्वरूप अत्यंत सुक्ष्म आहे

त्याच्या पर्यन्त आपल्याला जर पोहचायचं आहे.पण दृष्यापर्यन्त आपल्याला पोहोचयचं आहे

***




# कॉलेस्टेरॉलचं प्रमाण वाढवतात रोजच्या खाण्यातले हे पदार्थ; चांगल्या तब्येतीसाठी आजपासूनच खाणं सोडा.

ज्योतिर्मय साहित्य

कोलेस्टेरॉल हा एक असा पदार्थ आहे, जो शरीरासाठी चांगला आणि वाईट दोन्ही आहे. यामुळेच याला चांगले कोलेस्ट्रॉल आणि वाईट कोलेस्ट्रॉल अशा दोन नावांनी ओळखले जाते. चांगल्याला एचडीएल (हाय डेन्सिटी लिपोप्रोटीन) आणि बॅडला एलडीएल (लो डेन्सिटी लिपोप्रोटीन) म्हणतात. शरीराच्या चांगल्या कार्यासाठी चांगले कोलेस्टेरॉल आवश्यक असते, तर खराब कोलेस्टेरॉल वाढल्याने अनेक गंभीर जीवघेणे आजार होऊ शकतात.

जेव्हा रक्तवाहिन्यांमध्ये या मेणासारख्या पदार्थाचे प्रमाण वाढते तेव्हा ते रक्त प्रवाह कमी होण्याची शक्यता असते. ज्यामुळे हृदयरोग, हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. यकृत प्रत्यक्षात ते तयार करते परंतु आपण जे पदार्थ खातो ते देखील त्याचे प्रमाण वाढवते. आम्ही तुम्हाला अशाच काही खाद्यपदार्थांबद्दल सांगत आहोत, ज्यामुळे एलडीएल म्हणजेच खराब कोलेस्ट्रॉल वाढते. हृदय निरोगी ठेवायचे असेल तर त्याचे सेवन टाळावे.

प्रोसेस्ड मीट खाऊ नका

क्लीव्हलँड क्लिनिकच्यानुसार बाजारात उपलब्ध असलेले फ्रोजन आणि पॅकेज केलेले मांस अधिक काळ निरोगी ठेवण्यासाठी त्यांना दीर्घ प्रक्रियेतून जावे लागते. सॉसेज, हॉट डॉग, बेकन, फ्रोझन कबाब इत्यादी प्रक्रिया केलेल्या मांसाची काही उदाहरणे आहेत. यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमकुवत होऊ शकते. म्हणून शक्यतो अशा पदार्थांचा आहारात समावेश करू नका.

जंक फूड

जंक फूड हे वेगवेगळ्या प्रकारचे तेल, मसाले आणि मैद्यापासून बनवले जाते, जे कोलेस्ट्रॉल वाढवण्याचे काम करतात. या पदार्थांमध्ये चिप्स, नाचोस, मिल्क चॉकलेट, सोडा, फळांची चव असलेली पेये इत्यादींचा समावेश आहे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

फ्राय फूड

हार्वर्ड हेल्थच्या रिपोर्टनुसार तेलात तळलेले पदार्थ तुमच्या आरोग्यासाठी आणि कोलेस्ट्रॉलसाठी खूप वाईट असतात. या पदार्थांमुळे लठ्ठपणाही येतो. तळलेले अन्न प्रत्येकासाठी हानिकारक आहे.

गोड पदार्थ

शर्करायुक्त पदार्थांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते आणि त्यामुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका असतो. आइस्क्रीम, केक, पेस्ट्री, डोनट्स इत्यादी पदार्थ टाळावेत. या सर्व गोष्टी हृदयासाठी घातक आहेत.

फास्ट फूड

फास्ट फूडचा ट्रेंड झपाट्याने वाढला आहे. त्यामध्ये शरीराला हानी पोहोचवणारे सर्व घटक असतात. हे शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल झपाट्याने वाढवतात. ते तुम्हाला लठ्ठपणा, हृदयरोग, मधुमेह इत्यादींचा धोका देखील देतात.

***

# आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





## वेताळ कथा ११

एका राज्यात दोन शिष्य एका महान गुरूकडे शिक्षण घेत होते. दोघेही बुद्धिमान होते, पण एकजण नेहमी दुसऱ्याशी तुलना करत असे. दुसरा शिष्य शांत, स्थिर आणि समाधानी होता. तो आपले कार्य प्रामाणिकपणे करत असे. काळानुसार गुरुने दोघांची परीक्षा घेतली. पहिल्या शिष्याने इतरांपेक्षा श्रेष्ठ दिसण्यासाठी खूप प्रयत्न केले. दुसऱ्याने मात्र स्वतःच्या क्षमतेनुसार शांतपणे कार्य केले.
गुरूंनी निकाल दिला-दुसरा शिष्य अधिक योग्य आहे.
पहिल्या शिष्याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "मी अधिक मेहनत केली, तरी मला का निवडले नाही?"
गुरु म्हणाले – "तू इतरांशी स्पर्धा करत होतास,
पण तो स्वतःशी प्रामाणिक होता."
वेताळाने विचारले – खरे यश कोणाचे?
राजा विक्रम म्हणाला – "जो स्वतःला स्वीकारतो आणि प्रामाणिक राहतो, त्याचेच खरे यश."
या कथेवरून आपण स्वतःला प्रश्न विचारणे आवश्यक आहे
"मी इतरांशी तुलना करते का?"
"की माझ्या स्वतःच्या प्रवासावर लक्ष देते?"
या आत्मपरीक्षणानंतर समाधान मिळतं का हे ही तपासून पहावे
कारण "स्वतःला स्वीकारणे हीच अंतर्मनाची शांतता आहे.
या कथेत "ईर्ष्या आणि स्वस्वीकार " यांचा संघर्ष दिसतो.
तुलना : इतरांशी स्वतःची तुलना
ईर्ष्या: दुसऱ्याच्या यशाने अस्वस्थता
न्यूनगंड : "मी कमी आहे" ही भावना
जाणीव : प्रत्येकाची वाट वेगळी आहे
स्वस्वीकार: स्वतःला जसे आहे तसे स्वीकारणे
अश्या चिंतनातून विवेक जागृती होते व अनर्थ टळतो.
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# ‘‘एक तरी ओवी अनुभवावी’’...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

‘‘भगवंत हृदयस्थ आहे‘‘ ही ओळ आवडणे, त्याचेच सतत चिंतन करणे म्हणजे त्याचा मनापासून हृदयपूर्वक सातत्याने पाठलाग करणे म्हणजे अभ्यास व तो ही अगदी सहजपणे! नैसर्गिकपणे! एखादी गोष्ट मनापासून केली की त्याचा परिणाम मिळतोच!

‘‘ॲज वूई थिंक वूई बीकम‘‘ या त्रिकालाबाधित सत्याचा अनुभव घेणे म्हणजे ‘‘एक तरी ओवी अनुभवावी....‘‘ श्रवण मनन चिंतनानेच सिंहावलोकन शक्य आहे व जीवनानुभवांचा एकेक बिंदू जोडणे तरच जीवनरूपी वर्तुळ पूर्ण करता येईल. पूर्णाचा अंश आपण असल्याने अपूर्णाकडून समाधान शक्य नसल्याने या सर्व बिंदूतूनच संपूर्णाची वाटचाल शक्य आहे.

सिंहावलोकन आणि अनुभव हेच गुरु या न्यायाने व शास्त्र वाचन श्रावणाने सत्य अनुभवणे महत्त्वाचे मानले जाते.

अनुभव हाच श्रेष्ठ गुरु:

‘‘नास्ति विद्या समं चक्षुः नास्ति सत्य समं तपः।

नास्ति राग समं दुःखं नास्ति त्याग समं सुखम्।।‘‘

(विद्येसारखा डोळा नाही आणि सत्यासारखे तप नाही. पण ही विद्या केवळ पुस्तकी नसून अनुभवातून आलेली असावी, कारण स्व-अनुभव हाच खरा चक्षु म्हणजेच डोळा आहे.)

सिंहावलोकनाचे महत्त्व:

चाणक्य नीतीमध्ये म्हटले आहे की, माणसाने सिंहाकडून एक मोठा गुण शिकला पाहिजे:

‘‘बह्वल्पकार्यं वा यो नरः कर्तुमिच्छति।

सर्वारंभेण तत्कुर्यात् सिंहादेकं प्रचक्षते।।‘‘


(सिंह ज्याप्रमाणे आपले पूर्ण लक्ष देऊन शिकार करतो आणि अधूनमधून मागे वळून पाहतो, तद्वतच माणसाने आपल्या कार्याचा आढावा घेत पूर्ण शक्तीने काम करावे.)

२. संत साहित्याचा आधार

महाराष्ट्रातील संत परंपरेने अनुभव किंवा अनुभवामृत यालाच परब्रह्म मानले आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज:

ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीमध्ये अनुभवाचे महत्त्व ठायी ठायी सांगितले आहे. ते म्हणतात की,
जोपर्यंत आत्मज्ञान
अनुभवाला येत नाही,
तोपर्यंत शब्दज्ञान व्यर्थ आहे.




© अपर्णा परांजपे,
कात्रज पुणे. 95030 45495

‘‘जैसी हाता आली
कडाडी। आणि मती पडे
वेडी।

तैसे अनुभवाचे गुढी।
उभविली आम्ही।।‘‘

(जेव्हा अनुभवाची गुढी उभारली जाते, तेव्हा बुद्धीचे तर्क तिथे थिटे पडतात. स्वतःचा अनुभव हेच सर्वश्रेष्ठ प्रमाण आहे.)

संत तुकाराम महाराज : तुकोबांनी तर स्पष्टच सांगितले आहे की, केवळ पाठांतर करून उपयोग नाही, तर जे अनुभवलं आहे तेच बोलावे:

‘‘येथें पाहिजे जातीचें।
येरागबाळाचें काम नव्हें।।‘‘

(येथे केवळ पुस्तकी ज्ञान चालत नाही, तर ज्याने तो अनुभव घेतला आहे, तोच टिकू शकतो.)

तसेच, ‘‘अनुभवें आले अंगा। ते या जगा देतसे।।‘‘ - म्हणजे मला जे अनुभवातून उमजले, तेच मी जगाला सांगत आहे.

समर्थ रामदास स्वामी : दासबोधमध्ये समर्थांनी प्रचिती (म्हणजेच अनुभव) याला फार महत्त्व दिले आहे:

‘‘प्रत्ययाविण जे बोलणें। तें सगळेंची श्लाघ्यवाणें।‘‘

(ज्या गोष्टीला अनुभवाचा किंवा प्रत्ययाचा आधार नाही, ते बोलणे व्यर्थ आहे. माणसाने आपल्या प्रचितीवरूनच पुढचे मार्ग शोधले पाहिजेत.)

३. अनुभवातून मार्गदर्शन

संत साहित्यानुसार, आपले जीवन हाच एक ग्रंथ आहे. जेव्हा आपण सिंहावलोकन करतो, तेव्हा:

१. प्रचिती: आपल्याला सत्याचा प्रत्यय येतो.

२. सावधानता: भूतकाळातील ठेच आपल्याला भविष्यात सावध करते.

३. आत्मबोध: ‘‘मी कोण आहे आणि मी कुठे चुकलो?‘‘ हे आरशासारखे स्वच्छ दिसते.

थोडक्यात: संतांच्या मते, तुमच्या हृदयातील अनुभव हाच ईश्वर आहे जो तुम्हाला सतत मार्गदर्शन करत असतो

सिंहावलोकन हा शब्द अतिशय अर्थपूर्ण आहे. ज्याप्रमाणे सिंह चालता चालता थांबून मागे वळून पाहतो आणि आपण कापलेल्या अंतराचा व परिस्थितीचा आढावा घेतो, त्याचप्रमाणे मानवी आयुष्यात आत्मपरीक्षण करणे गरजेचे असते.

१. अनुभवांची शिदोरी आणि शहाणपण

आपल्या आयुष्यात घडणारी प्रत्येक घटनामग ती चांगली असो वा वाईटकाहीतरी शिकवून जाते. जेव्हा आपण शांतपणे मागे वळून पाहतो (सिंहावलोकन करतो), तेव्हा आपल्याला कळते की ज्या संकटांमुळे आपण खचलो होतो, त्यांनीच आपल्याला अधिक मजबूत बनवले आहे.

२. चुकांमधून सुधारणा

माणूस चुकांचा पुतळा आहे, पण त्याच चुकांची पुनरावृत्ती टाळणे म्हणजे प्रगती. स्वतःच्या भूतकाळातील निर्णयांचे विश्लेषण केल्यावर आपल्याला समजते की, ‘‘त्यावेळी मी असे वागायला हवे होते.‘‘ हे आकलन म्हणजेच अंतर्गत मार्गदर्शन होय.

३. स्वतःची ओळख

बाहेरचे जग आपल्याला काय करावे हे सांगत असते, पण आपला अनुभव आपल्याला काय जमेल हे सांगतो. स्वतःच्या अनुभवांचे चिंतन केल्यावर आपल्याला आपल्या मर्यादा आणि शक्ती समजतात. यातूनच स्वत्व गवसते.

४. दृष्टीकोनात बदल

एखादी घटना घडते तेव्हा आपण भावनेच्या भरात असतो. मात्र, काही काळाने जेव्हा आपण सिंहावलोकन करतो, तेव्हा त्या घटनेकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन अधिक प्रगल्भ आणि तटस्थ झालेला असतो. हा तटस्थपणाच आपल्याला योग्य दिशा दाखवतो.

थोडक्यात सांगायचे तर:

बाहेरचा गुरु फक्त मार्ग दाखवू शकतो, पण त्या मार्गावर चालताना येणारे खड्डे आणि वळणे आपले अनुभवच आपल्याला शिकवतात. जो माणूस आपल्या भूतकाळातील अनुभवांचा आदर करतो, त्याला भविष्यासाठी कोणा दुसऱ्याच्या मार्गदर्शनाची फारशी गरज उरत नाही.

असे सगळे चिंतन सुध्दा गुरुकृपेशिवाय अशक्य आहे याची मला पूर्ण कल्पना आहे.

भगवंत हृदयस्थ आहे

***




## पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय जलदिवस

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कामठी - पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय कामठी येथे आंतरराष्ट्रीय जल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर सुधीर अग्रवाल होते.. याप्रसंगी मंचावर पर्यवेक्षक प्राध्यापक विश्वनाथ वंजारी डॉ. नीता वानखेडे व पर्यावरण विभागाच्या प्राध्यापिका सुषमा ओझा उपस्थित होत्या. प्रा विश्वनाथ वंजारी यांनी आपल्या भाषणातून जल है तो कल है

आपले भविष्य आजच्या आपल्या जलसंवर्धनावर अवलंबून आहे. पाणी जीवनाचा आधार आहे आणि त्याशिवाय पृथ्वीवर जीवन अशक्य आहे.

पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे व पावसाच्या पाण्याचे संचय करण्याचे आवाहन केले तर अध्यक्षीय भाषणातून प्रा डॉ सुधीर अग्रवाल यांनी पाण्याचा अमर्याद वापर आणि प्रदूषणामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत आहे. भावी पिढीसाठी पाणी वाचवणे (उदा. पाणी अडवा, पाणी जिरवा) ही काळाची गरज आहे, कारण पाणी हेच जीवन आहे. पाणी हेच जीवनाचा आधार आहे,पाणी हाच शेतीचा आधार आहे,पाणी हाच औद्योगिक विकासाचा आधार असल्याचे प्रतिपादन करून पाण्याचे महत्व अधोरेखित केले. या दरम्यान स्पर्धक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांच्या गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका सुषमा ओझा यांनी केले.

इको क्लबच्या माध्यमातून

‘‘शांततेसाठी पाणी‘‘ व जलसंधारण या थीमवर आधारित कार्यक्रम, पोस्टर्स, रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा, आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पाण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. . या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आणि समाजाला पाणी वाचवण्याचे महत्त्व पटवून देणे हा होता, जेणेकरून भविष्यातील पाण्याचे संकट टाळता येईल. कार्यक्रमाचे संचालन ॲमीलिया जेम्स व हदीसा फातिमा यांनी केले तर आभार प्रदर्शन जमजम शिफा यांनी केले

## अवयवदान जनजागृतीसाठी भव्य श्रीयश मिनी मॅरेथॉनचे आयोजन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : अवयवदानाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उदात्त हेतूने श्रीयश प्रतिष्ठान तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य ५ कि.मी. श्रीयश मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ही मॅरेथॉन दि.२९ मार्च २०२६ रोजी होणार आहे. ही स्पर्धा डिव्हिजनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, सुतगिरणी चौकाजवळ गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार असून सहभागींसाठी सकाळी ५:३० वाजता रिपोर्टिंग व सकाळी ६:०० वाजता मॅरेथॉनला प्रारंभ होईल.

स्पर्धेची नोंदणी फी ₹४००/- असून त्यामध्ये अधिकृत टी-शर्ट व प्रमाणपत्राचा समावेश आहे. स्पर्धेत १६ ते ५० वर्षे (पुरुष व महिला) तसेच ५० वर्षांवरील (पुरुष व महिला) अशा गटांमध्ये स्पर्धा होणार आहे. प्रत्येक गटातील विजेत्यांना प्रथम पारितोषिक ₹१०,००० व द्वितीय पारितोषिक ₹७,००० देण्यात येणार असून एकूण पारितोषिकांची रक्कम ₹६८,००० आहे.

मॅरेथॉनचा मार्ग पुढीलप्रमाणे राहील
डिव्हिजनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, दर्गा चौक, भाजीवाली बाई पुतळा, पीर बाजार चौक, भाजीवाली बाई पुतळा, दर्गा चौक, डिव्हिजनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स.

या भव्य मॅरेथॉनमध्ये धावपटू, क्रीडापटू, विद्यार्थी तसेच व्यावसायिक स्प्रिंटर्स सहभागी होऊ शकतात. नोंदणीची अंतिम तारीख दि. २५ मार्च २०२६ असून इच्छुकांनी खालील लिंकवर नोंदणी करावी
https://pay.syp.ac.in/
syp-marathon26

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरुळे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अवयवदानासारख्या महत्त्वपूर्ण सामाजिक कार्यासाठी जनजागृती निर्माण करण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्चचे संचालक व कार्यक्रम समन्वयक डॉ. सचिन वानखेडे यांनी सांगितले की, या भव्य मॅरेथॉनला सहभागींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अधिक माहितीसाठी संपर्क प्रा. अनिल पालवे मीडिया मॅनेजर, श्रीयश प्रतिष्ठान, संपर्क : ९३२५१४६५६६ / ०२४०-६६०८७५२

## ओळख साहित्यिकांची



**स्वप्नगंधा सतीश आंबेतकर, मुंबई.**
**कला शिक्षिका.**

■ सर्व प्रसारमाध्यमातून , वर्तमानपत्र, अनेक समूहातून उत्कृष्ट काव्य, लेख सर्व प्रकारचे लिखाण. काही प्रातिनिधिक काव्यसंग्रहामध्ये सहभाग देखील आहे. उत्कृष्ट चित्रकला शिक्षक, अनेक प्रकारच्या कला प्राविण्य असलेल्या कवयित्री.

■ निवृत्त कला शिक्षिका अरविंद गंडभीर हायस्कूल, जोगेश्वरी, पूर्व, मुंबई.
बालपणापासून सुसंस्कारी, शैक्षणिक व कलात्मक वातावरणात वाढल्यामुळे कलेची व शिक्षणाची आवड.

■ टायपिंग इंग्रजी, मराठी शिकले व त्या च संस्थेत नोकरी मिळाली. तिथे काम करता करता मला कलेची आवड होतीच, नंतर शिवणकाम, भरतकाम हा सरकारी कोर्स हा कोर्स झाल्यानंतर तेथेच शिकवत होते. नंतर घरी शिवणकाम, भरतकाम, पेंटिंग वगैरे शिकवत होते.
हे करता करता टेक्सटाईल डिझायनरची ऑर्डर मिळाली. अभिनय, संगीत, वकृत्व सगळ्याची आवड असल्याने तिथेही संधी मिळाली. पाच कौटुंबिक दर्जेदार नाटकांत मुख्य नायिकेची भूमिका केली हौस म्हणून, नंतर खटाव मिलचा डिझायनर म्हणून संधी आली होती, पण ती सोडली व आर्ट कॉलेजमध्ये जायचे होते. बान्द्रा स्कूल ऑफ आर्ट मध्ये कलेचे शिक्षण पूर्ण केले, नोकरीसाठी प्रयत्न करता दोन ठिकाणी पुन्हा टेक्सटाईल डिझायनरचे काम केले.
मधल्या वेळात आर्ट क्राफ्ट क्लास घेणे, थोडेफार लेखन करणे, कविता करणे आर्ट शिकवणे चालूच होते.

■ अनुताई वाघ यांच्या संस्थेत स्पेशल कला शिक्षकाची नेमणूक झाली, तेथे बालवाडी, पहिली ते सातवी, आठवी ते अकरावी, नंतर डी. एड कॉलेज, अंगणवाडी, बाल सेविका या सर्व वर्गावर कला शिक्षिका म्हणून नेमणूक झाली.

■ कालांतराने मुंबई येथे अरविंद गंडभीर या हायस्कूल मध्ये कायमस्वरूपी कलाशिक्षिकेचा जॉब मिळाला व निवृत्त होईपर्यंत तेथेच काम केले.

■ कलेची आवड लहानपणापासून असल्याने चित्र कला, हस्तकला, रांगोळी, स्पर्धेत सतत पाच वर्षे प्रथम पारितोषिके मिळाली.
शिवणकाम, भरतकाम, फ्लॉवर मेकिंग, विणकाम, मूर्ती काम, संगीत, अभिनय, लेखन, वाचन, ज्योतिषशास्त्र, वास्तूशास्त्र, पाकशास्त्र, बागकाम सर्वांची आवड आहे. तसेच आयुर्वेदिक औषधांची माहिती करुन घेणे. उटणे, तेल बनवणे वगैरे सर्व चांगल्या जीवनोपयोगी आनंददायक गोष्टींची आवड.
शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रम बसविणे, मुलांना त्यासाठी तयार करणे, एलिमेंटरी, इंटरमिजिएट सरकारमान्य परीक्षांचे क्लास घेणे, परीक्षेत, स्पर्धेत मुलांना भरघोस यश मिळवून देणे.
दरवर्षी मेडल, पारितोषिके मिळविणे.

■ एकंदरीत कलात्मक प्रवास.
अंतरंग मराठी मायबोलीचे काव्यसंग्रहात 22 कविता प्रकाशित.

■ आस्वाद अंतर्मनातील काव्यसंग्रहात तेरा कविता प्रकाशित

■ आई या संग्रहात तीन कविता
संवाद मिडिया वर दर महिन्यात एक, दोन कविता

■ प्रसारित

■ तीन कवितांचे यु ट्युब वर प्रसारित

■ न्यू पोर्टलमिडियावर पंधरा सोळा कविता प्रसारित झाल्या.

■ साधारण पाचशेच्या वर कविता लिहिल्या.
पूर्वी मासिकात कथा, कविता पाठवित असे, आकाशवाणी, पाच कविता व लेख वाचन झाले होते.
दूरदर्शन वर मनोगत मध्ये कलेसंबधित विचार मांडले होते.
सध्या आर्ट क्लास चालू आहे त. कलेची आवड अजूनही आहे.
मुलांना प्रोत्साहित करून कलेचे महत्व पटविणे, मार्ग दर्शन करणे.







विनोद शिराळकर 9325383999



### विक्रम वेताळ आणि डायरेक्ट मार्केटिंग

♦ इनव्हेस्टमेंट, सातत्य आणि SIP

पुढे.....
लोकांनी त्यांना होणाऱ्या हाल अपेष्टा सांगितल्या आणि पुन्हा पाऊस पाडण्यासाठी विनंती केली,
इंद्र देवाला पण दया आली... ते म्हणाले ठीक आहे... मी माझा शाप परत तर घेऊ शकत नाही पण एक उष्षाप देतो.... जेव्हा भगवान शंकर डमरू वाजवतील तेव्हा पाऊस येईल.... असे म्हणून इंद्र देव अंतर्धान पावले...इंद्र देवाने शाप देताना भगवान शंकराला पण १२ वर्ष डमरू न वाजवण्याची विनंती केली होती ...आता दिलेल्या उष्षापा बद्दल मात्र सुचना द्यायला ते विसरले. आणखी काही दिवस विना पावसाचे गेले.. एकदा शंकर पार्वती सृष्टी ची पहाणी करण्यासाठी नेमके त्याच गावात वेष बदलुन आले.गावातल्या लोकांना अन्न पाण्या साठी रोज पायपीट करताना पाहून पार्वतीला वाईट वाटलं...पण एक शेतकरी मात्र तीला नियमित पणे शेतात जाऊन काम करताना दिसला. शंकर पार्वती त्या शेतकऱ्याला भेटले आणि त्यांनी त्याला एक प्रश्न विचारला...या गावात बारा वर्षे पाउस पडणार नाही असे आम्ही ऐकलं आहे.. पाऊस पडणार नाही हे माहीत असूनही तू रोज शेतात काम का करतो आहेस? क्रमशः....




### ♦ माणूस - बापाची भूमिका

रसिक वाचकहो,आजच्या स्त्री पुरूष समानतेच्या काळात महिलाचे कार्ये श्रेष्ठ कि पुरूष जातीचे श्रेष्ठ हे सांगता येणार नाही, तरी महिला वर्गाची क्षमा मागून आज मी थोडक्यात माणूस बापाबद्दल
सांगतो आहे. माणूस बापाजवळ ना कधी असते माहेर, किंवा नसते मोकळे आकाश! किंवा मोकळे अंगणही मिळत नाही, जिथे तो निसंकोचपणे परतू शकेल.
पटते का बघा.. असं एखादं ठिकाण किंवा "थांबा "नसतो त्याला, जवळ बसवून कोणी त्याला म्हणतो का.."थकलास काय, थोडा आराम कर, "तो फक्त चालतच राहतो. कधी पूत्र बनून आज्ञाधारकपणे 'वनवास 'भोगतो. तर पती बनून बासरी वाजवितो, मित्र बनून सुदाम्याचे पाय धुतो, राम असो किंवा कृष्ण, द्यानोबा असो, जबाबदारी न थांबता..!!उलट जनता त्याला 'दशाननाचा वध करायला लावते. तर कधी अर्जुना सारख्याना उपदेश तर
कधी पसायदान मागायला लावते. तर असा हा बाप माणूस, काय बरोबर ना, तर आता हे बापपुरान थांबवतो व मीही थांबतो. शुभ दिवस, आपला दिवस आनंदी जावो!
परत ऊध्या भेटू नविन विषय घेऊन. टेक केअर.




ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906


# गायिका आणि संशोधिका अंजली मालकर

ज्योतिर्मय साहित्य

रविवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी पुण्यामध्ये 'रूप बंदिश फाउंडेशन प्रस्तुत' हिंदुस्थानी संगीतातील प्रबंध गायकी ते ख्याल गायनप्रकारापर्यंत झालेल्या बदलाची मनोरंजक दृक-श्राव्य आणि गेय कथा यांचे लेखन, सादरीकरण प्रसिद्ध गायिका आणि संशोधिका अंजली मालकर यांनी केले. त्यांच्याशी संवाद साधला प्रभा जोशी यांनी. हे सादरीकरण त्याचबरोबर सादरीकरण करताना अंजली मालकर यांचे गायन ऐकण्याची उत्तम संधी मला मिळाली. साधारण ५-६ वर्षापूर्वी अंजली मालकर यांच्या ग्रुपच्या एका संगीतमय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मी केले होते. २००५ साली मराठवाड्यातील अभिजात संगीत हे पुस्तक हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या गायिका म्हणून सुपरिचित असलेल्या अंजली मालकर यांनी प्रकाशित केले. हे पुस्तक संगीतक्षेत्रामध्ये मैलाचा दगड ठरलेले आहे. नुकतेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अंजली मालकर यांनी गेल्या दहा वर्षात संशोधनात्मक काम करून सिद्ध केलेले हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहासचे दोन खंड प्रकाशित केले आहेत. यातील पूर्वार्ध हा पहिला खंड तेरावे शतक ते अठरावे शतक असा आहे तर दुसरा उत्तरार्थ हा खंड अठरावे शतक ते इ.स. १९४७ असा आहे. पहिल्या खंडावर आधारित दोन ते अडीच तासाची मैफिल संगीतसाक्षर रसिकांसाठी आणि इतरांसाठी मेजवानी ठरली. माहिती सांगत असताना अंजली मालकर यांनी सांगितलेल्या गेय कथा या संगीतमय कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षण ठरल्या.

अमीर खुस्त्रो यांच्याबद्दल सांगताना अंजली मालकर म्हणाल्या....

अमीर खुस्त्रो यांचे हिंदुस्थानी संगीताच्या जणघडणीत खूप मोठे योगदान मानले गेले आहे. फारसी वडील आणि हिंदुस्थानी आई अशा मिश्र संस्कृतीत इ.स. १२५३ मध्ये उत्तर प्रदेशमधील इटा जिल्ह्यातील मोमीनाबाद येथे जन्मलेले अमीर खुस्रो भारतीय संगीताचे चाहते होते. त्यांनी स्वतःला हिंदुस्थानी पोपट (तुती-ए-हिंद) म्हंटले असून किरान स्सादैन मध्ये ते म्हणतात, हिंदुस्थानी संगीताशी इतर कुठल्याच देशातील संगीताचा मुकाबला होऊ शकत नाही.' इथले संगीत आगीसारखे आहे, जे शरीर आणि आत्मा दोन्ही प्रज्वलीत करते. कलाकार जगाच्या वेगवेगळ्या भागातून इथे येऊन संगीताची तालीम घेण्याचा प्रयत्न करतात, पण ते असफल होतात. इथले संगीत मनुष्यालाच नाही तर प्राण्यांनाही




मुग्ध करते. संगीताच्या प्रभावाने इथले हरीण गुंग होतात आणि धनुष्य बाणाशिवाय ते शिकार होतात. जर कोणी म्हटले की वाळवंटात उंट संगीताच्या मदतीने प्रवास करतात तर, ते प्रवास करताना रस्ता कळण्याच्या किमान शुध्दीत तर असतात. पण इथे हरीण आपल्या मृत्यूपर्यंत धुंदीत असतात.

तानसेन यांच्याबद्दल अंजली मालकर यांनी त्यांचा अधिकृत जीवन वृत्तांत इतिहासात सापडत नसला तरी इतर लेखकांकडून मिळालेले संदर्भ, तानसेन यांच्या ध्रुपद रचनांमधून काढलेला अन्वय आणि दंतकथा यांच्या आधारे ढोबळ विवेचन केले. त्या म्हणाल्या अबुल फजल यांनी तानसेन यांच्या बद्दल असे म्हटले आहे की, असा ध्रुपद गायक हजार वर्षात होणार नाही. तसेच शहजादा जहाँगीर याने म्हंटले असा गायक होणारच नाही. महान कलाकार तानसेन बादशाह अकबराच्या नवरत्नापैकी एक होते. बऱ्याच संगीततज्ञांच्या मते तानसेन ही त्यांना मिळालेली उपाधी होती. ती बांधवगढचे 'राजा रामचंद्र' यांनी त्यांना बहाल केली होती, तर काहींच्या मते ही उपाधी राजा मानसिंह तोमर यांचे पुत्र विक्रमजीतसिंह यांनी त्यांना दिली होती. तानसेन यांचा जन्म वल्लभ संप्रदाय वार्ता साहित्यानुसार ग्वालियरचा आहे. जन्म इ.स. १५०० च्या सुमारास झाला असावा. तानसेन यांच्या वडिलांचे नांव मकरंद पांडे होते, यालादेखील दंतकथे शिवाय इतर दुसरा पुरावा मिळालेला नाही. ते जन्माने ब्राम्हण होते, असा पुरावा एका ध्रुपदातून प्राप्त होतो.

जै-जै कर पूजौ धौलागढ की रानी ने ।

बीर बली वंश ब्राम्हण कुळ तारन तानसेन बरदानी में ।।

याला पुष्टी वल्लभ संप्रदाय के वार्ता साहित्य या ग्रंथातून मिळते.

तानसेन यांनी ग्वालियरला संगीत शिक्षण घेतल्यावर एक उत्कृष्ट गायक म्हणून त्यांची ख्याती सर्वदूर पसरली. त्यांना राजा मानसिंह तोमर, त्यांचे पुत्र विक्रमजीत यांच्याकडून यश, मानसन्मान प्राप्त झाला. इ.स. १५२३ मध्ये ग्वालियर राज्य पराभूत झाल्यावर तिथली कलाकार मंडळी इतर राज्यांकडे आश्रयाला गेली. त्यात नायक बख्शू कालिंजरचे राजा कीरत व नंतर गुजरातचे सुलतान बहादूरशाहकडे गेले. गोपाललाल काश्मीरला तर तानसेन सर्वप्रथम शेरशाह सुरी यांचे उत्तराधिकारी आदिलशाह अदलीकडे आश्रय घेतल्याचा उल्लेख अबुल फजल यांनी केला आहे. नंतर ते बांधवगडचे राजा रामचंद्र यांचे दरबार गायक झाले. तानसेन यांना राजा रामचंद्र यांनी मान-सन्मान, धनदौलत देऊन अनेक वेळा सन्मानित केले. तानसेन यांना राजा रामचंद्र यांनी एक लाख टांक दिले होते असे म्हणतात. तानसेन यांनी या आपल्या प्रिय राजा रामचंद्र यांच्यावर लिहिलेली ध्रुपदे प्रसिद्ध आहेत.

तानसेन यांची प्रसिध्दी आणि गायनाची प्रशंसा ऐकून मुद्धल




बादशाह अकबर यांना तानसेन आपले दरबार गायक असावेत असे वाटले. अबुल फजल यांनी नोंदवल्यानुसार बादशाह अकबर याने आपल्या सातव्या वर्षाच्या शासन काळात तानसेन यांना आपल्या दरबारात उपस्थित राहण्याचे निमंत्रण बादशाहचे विश्वसनीय सेवक जलाल रॅवा कुरसी यांच्या हस्ते पाठवले. शाही निमंत्रणापुढे विवश होऊन राजा रामचंद्र यांनी आपल्या आवडत्या गायकाची बहुमूल्य भेटवस्तू देऊन पाठवणी केली. अकबरनामा या ग्रंथानुसार इ.स. १५६२ च्या दरम्यान तानसेन अकबराच्या दरबारात रुजू झाले. अबुल फजल यांच्या आईन-इ-अकबरी अनुसार तानसेनाच्या पहिल्या गायनाने अत्यंत प्रभावित होऊन सम्राट अकबराने त्यांना दोन लाखांचा पुरस्कार दिला. तानसेन यांच्या गायनशैलीतील परिपक्वता आणि गायन सौंदर्य इतके अनुपम होते की अकबर बादशाहाने त्यांना कण्ठा भरण वाणी विलास ही उपाधी बहाल केली. तानसेन यांनी शेवटपर्यंत बादशाह अकबराची चाकरी करीत त्यांच्यावर अनेक ध्रुपदे बांधली.

अंजली मालकर यांना आतापर्यंत स्वरसाधना आणि संगीत रत्न या दोन पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांनी संशोधनात्मक काम करून जे दोन ग्रंथ निर्माण केले आहेत ते मराठी माणसाच्या संग्रही असले पाहिजेत. रंजक पद्धतीने निर्माण केलेल्या या ग्रंथामुळे आपल्या मनात आनंदझरा उचबंळुन वाहिल्याशिवाय रहात नाही.

# कवितेचं गाणं

ज्योतिर्मय साहित्य

थोडी रेंगाळलेली सकाळ होती. मी सवयीने रेडिओ सुरू केला. 'देवा, तुझे किती सुंदर आकाश, सुंदर प्रकाश सूर्य देतो' हे गाणं रेडिओवर सुरू होतं. मी म्हटलं, 'किती सुंदर गाणंय हे!'

कृष्णानं हे माझे शब्द ऐकले आणि माझ्या गळ्यात पडला म्हटला, 'पण आई, ही तर आमच्या पुस्तकातली कविताय मग ह्या कवितेला तू गाणं कसं म्हणतेस गं?'

मी हसले म्हटलं, 'कविता म्हणजेच गाणं'

कपाळावर आठ्या आणून तो काही न बोलता हॉलमध्ये गेला. दप्तरातलं पाठ्यपुस्तक बाहेर काढलं, काही पानं उलटली आणि एक कविता मला दाखवली आणि विचारलं, ही कविता पण गाणंय का? लाव बघू रेडिओवर ह्या कवितेचं गाणं'

मी म्हटलं, 'सगळ्याच कवितांची गाणी होत नाहीत रे'

'मग थ्री इडियटस् मधलं ऑल इज वेल गाणं पण कविताच आहे का?' त्याची विचारचक्रं गतीनं फिरु लागली.

त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव बघून मी ओळखलं की हीच योग्य वेळ आहे त्याची कवितेशी ओळख करून देण्याची.

मग सगळ्या कवितांची गाणी होत नसली तरीही कोणतंही गाणं हे आधी कविताच असतं, हे त्याला पटवून देण्यासाठी मी सरसावले. 'कविता म्हणजे गं काय आई?' त्यानं प्रश्नांना सुरुवात केली. त्याला समजेल अशा त्याच्या भाषेत समजावून सांगणं गरजेचं होतं.

म्हटलं, ' तू पत्त्यांचा बंगला कसा करतोस?'

तो म्हणाला,'पानं एकावर एक रचूनच ना?'

मग मी. पटकन सांगितलं, 'बरोबरै तसंच योग्य शब्द निवडून त्यांची योग्य रचना करायची म्हणजेच कविता '

तो एकदम गप्प झाला. एका जागी बसून राहिलेल्या कृष्णाचं मी निरीक्षण करु लागले. नक्की काय विचार करत असेल हा मुलगा, याचा अंदाज बांधू लागले.

मग अचानकच उसळी मारुन तो म्हणाला,

'बाबा इंजिनिअर,<br>
आई अनाऊन्सर,<br>
दीदी अँकर<br>
आणि मी आर्चर'<br>
आई, ही कविता आहे का गं?'

म्हटलं, 'अरे ही तर खरंचच कविताय. किती छान यमक जुळवलंस तू!'

साहजिकच यमक जुळवलं म्हणजे काय हा प्रश्न अपेक्षेप्रमाणे आलाच. मग आमच्या बोबडकांद्याची बोबडगाणी आणि आमचं यथामती विश्लेषण असं चर्चासत्र ब्रेक घेत घेत बरेच दिवस चालू राहिलं. मला माझं प्राथमिक शिक्षण आठवलं. माझी आईच माझी पहिली ते चौथीची शिक्षिका. शाळेत शिकवताना तिनं एकदा सांगितलं होतं की




आपली आणि कवितेची पहिली ओळख होते ती आईच्या कुशीतच. आपली आई आपल्यासाठी अंगाई गाते ती अंगाई म्हणजे कविताच असते. मग घास भरवताना एक घास काऊचा, एक घास चिऊचा, इथं इथं बस रे मोरा,

अशा बालगाण्यातून प्राणीपक्षीही आपल्याला भेटतात. या माझ्या आठवणी मी कृष्णाला सांगितल्या. त्याला माझी आई म्हणजे एकदम ग्रेट आई वाटली. पुढे मला माझ्या पाठ्यपुस्तकातील आठवतील त्या कविता मी त्याला ऐकवू लागले. मंगेश पाडगांवकर यांची 'वेडं कोकरु', कवी यशवंत यांची शेतकरी आणि बैलाचं नातं सांगणारी 'सण एक दिन' या कविता ऐकून हमसून हमसून रडलेला कृष्णा मला जसाच्या तसा आठवतो. दहावीच्या त्याच्या पाठ्यपुस्तकात द.भा.धामणस्कर, पद्मा गोळे यांच्या कविता त्यानं माझ्याकडून आवर्जून समजून घेतल्या होत्या. तसेच जगदीश खेबूडकर यांची 'आकाशी झेप घे रे पाखरा' ही चित्रपटगीत झालेली कविता समजावून सांगणं मला कठीण गेलं नाही कारण मी सरळ त्याला 'आराम हराम आहे' हा चित्रपट टीव्हीवर लावून दिला. कमालीचा रमला होता तो चित्रपट बघताना.




अभंग, ओवी, मुक्तछंद, अष्टाक्षरी, षडाक्षरी, हायकू हेही कवितेचे प्रकार आहेत हेही तो हळूहळू शिकला. त्याची आणखी एक गंमत इथं सांगायचा मोह मला आवरत नाहीये. मी त्याला हायकूची वैशिष्ट्य त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होते. काही हायकू वाचून दाखवत समजावून सांगत होते. तो अचानक म्हणाला,

मी आमटी सांडली<br>
आई चिडली<br>
लगेच हसली.

'आई, ही माझी हायकू' आनंदाने टाळ्या वाजवत तो म्हणाला.

क्या बात है क्या बात है, त्याच्या बाबांनी प्रतिसाद दिला.

लगेच वैष्णवी म्हणाली, 'अहो बाबा, अशी दाद गझलेला देतात ना?' आमची हसून हसून पुरेवाट झाली.आणि कृष्णा गझलेकडे वळला.

त्याला नेहमी प्रश्न पडायचा, एखादी गोष्ट सरळ सरळ शब्दात सांगण्याऐवजी कवीलोक असं आडपडद्यानं का सांगतात? कवीला काय सांगायचंय ते वाचकांनी कसं ओळखायचं? असं तो नेहमीच म्हणतो.

हा प्रसंग बालजिज्ञासेचं सुंदर चित्र उभं करतो, असं मला वाटतं. कृष्णाच्या प्रश्नांतून एक गोष्ट स्पष्ट दिसते मुलं प्रत्येक गोष्ट आपल्या अनुभवातून समजून घेतात. त्याच्यासाठी कविता म्हणजे पुस्तकातली गोष्ट आणि गाणं म्हणजे रेडिओवर ऐकायची गोष्ट. त्यामुळे ''कविता म्हणजे गाणं'' हे त्याला लगेच पटलं नाही. तिथूनच त्याचे प्रश्न सुरू झाले.

कृष्णानं ऐकून विचार करुन मला प्रश्न विचारला . ''ही पण कविता आहे का?'', ''यमक म्हणजे काय?'', ''कवी असं का लिहितात?'' हे प्रश्न ऐकून असं जाणवतं की तो गोष्टींचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. हीच खरी जिज्ञासा असते. फक्त माहिती नाही, तर त्यामागचं कारण समजून घेण्याची इच्छा.

या सगळ्यात माझी भूमिका खूप महत्त्वाची ठरली. मी त्याला थेट उत्तर न देता, त्याच्या ओळखीच्या उदाहरणातून (पत्त्यांचा बंगला) कविता समजावून सांगितली. त्यामुळे त्याला समजणं सोपं गेलं. अशा प्रकारे शिकवलं की मुलं जास्त चांगलं समजून घेतात, असा माझा अनुभव आहे

यातून आणखी एक सुंदर गोष्ट दिसते कृष्णानं स्वतःच्या भाषेत काही मांडलं ''बाबा इंजिनिअर, आई अनाऊन्सर'' या त्याच्या ओळी म्हणजे त्याची स्वतःची कल्पना. म्हणजेच, तो फक्त शिकत नाही, तर नव्या पद्धतीने विचार करायलाही लागतो. ही जिज्ञासेची पुढची पायरी आहे.

तसंच, तो कविता ऐकून भावूक झाला, रडला याचा अर्थ त्याला शब्दांमधली भावना समजलीय त्यामुळे कविता त्याच्यासाठी फक्त शब्द राहत नाही, तर एक अनुभव बनते.

शेवटी त्यानं विचारलं, ''कवी सरळ का सांगत नाहीत?'' हा खूप छान प्रश्न आहे. यातून दिसतं की तो अजून खोलात जाऊन विचार करु शकतो. शब्द कसे वापरले जातात, त्याचा अर्थ कसा बदलतो, हे समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहे.

आज कृष्णा अजून कवितेच्या जगात रुळला नाहीये शब्दांची जादू त्याला पूर्णपणे समजली नसेल कदाचित पण कधी तरी एखादा शब्द, एखादी ओळ त्याच्या मनाला हलकेच स्पर्शून जाते हे नक्की.

एकूणच, मुलांची जिज्ञासा खूप नैसर्गिक असते. त्यांना योग्य वातावरण, संयमाने उत्तरं आणि सुसंवाद साधला गेला, तर ते फक्त शिकत नाहीत, तर स्वतः विचार करायला, अनुभव घ्यायला आणि नवीन काही निर्माण करायला शिकतात.

***



# ज्येष्ठ नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांचा सत्कार

ज्योतिर्मय साहित्य

गडचिरोली - दि. २३ मार्च ला राज्य परिवहन महामंडळ गडचिरोली येथे सन्माननीय सचिन नेवारे सर (आगार व्यवस्थापक) यांच्या हस्ते झाडीपट्टीतील प्रसिद्ध नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

एसटी गोंडवाना सगाजन समिती व रा.प.म. विभाग गडचिरोली येथील रंगकर्मी व कर्मचारी वृंद यांचेतर्फे वीर बाबुराव शेडमाके यांच्या १९३ व्या जयंतीदिना निमित्त दि.११ मार्च रोजी गोंडवानाचा महायोद्धा : क्रांतिवीर बाबुराव शेडमाके या नाटकाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या नाटकाचे लेखन प्रसिद्ध नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांनी केले असल्याने एस. टी. गोंडवाना सगाजण समिती व रा.प.म. कर्मचारी वृंद यांच्या वतीने या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी या नाटकाचे दिग्दर्शक राजरत्न पेटकर, प्रसिद्ध रंगकर्मी अशोक सुत्रपवार, भास्कर आत्राम (मुख्य सल्लागार, एस.टी. गोंडवाना सगाजण समिती), प्रवीण तलांडे (अध्यक्ष, एसटी गोंडवाना सगाजन समिती), अमोल जोनमवार व निशिकांत ऊईके (रंगकर्मी व एसटी कर्मचारी) तथा इतर कर्मचारी वृंद हे मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. एस. टी. महामंडळ कर्मचारी वृंदा तर्फे या नाटकाचे दोन प्रयोग यशस्वीरित्या सादर करण्यात आलेले असून नाटकातील कलावंतांना रा.प. म.नाट्यस्पर्धेत अभिनयाचे पुरस्कारदेखील प्राप्त झाले आहेत. याबद्दल नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांनी त्यांचे कौतुक केले व सत्काराबद्दल आभार मानले.

# सुप्रसिद्ध व्याख्याते योगेश गुप्ता (दिल्ली) यांचे व्यावसायिक बंधू साठी व्याख्यानाचे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर : आज काल सर्वचजण दिवस-रात्र खूपच बिझी असतात. त्यांचा व्यवसाय, नोकरी सोडून त्यांच्याकडे आजिबात वेळ नसतो. एखाद्या मीटिंग, सेमिनार, ट्रैनिंगला या म्हंटले की ते आजिबात वेळ नाही असे सांगतात. दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:३० ते २:३० या वेळेत इंटरनॅशनल सेल्स ट्रेनर श्री योगेश गुप्ता सर (दिल्ली) आपल्याला ''७ गोल्डन रूल्स ऑफ सेल्स ''या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. वरील वेळेत व्यवसाईक बंधु भगिनींना या ट्रैनिंग प्रोग्रॅममुळे भविष्यात लाखो रुपये कमावण्याची संधी आणि युक्ती शिकायला मिळणार असेल तर जरूर या. लक्षात ठेवा दि २४/३/२०२६ सकाळी ११:३० वाजता बलवंत वाचनालय, औरंगापुरा सिग्नल, छत्रपती संभाजीनगर. सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. येताना वही - पेन सोबत आणवा.



# संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा मासिक मेळावा उत्साहात साजरा झाला. स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी झालेल्या या मेळाव्यात भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या प्राजक्ता सहस्त्रबुद्धे, प्राण्यांसाठी विशेष कार्य करणाऱ्या उर्मिला खांडेकर, पेट्रोल पंपावर व्यवस्थापक पदी काम करणाऱ्या सविता कुलकर्णी आणि वैद्यकीय व्यवसायातील डॉ. वर्षा देशपांडे यांचा महिला दिनानिमित्त भेटवस्तू आणि गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. सत्कार मुर्तींचे स्वागत श्रध्दा खांडेकर, राजश्री शुक्ल, वृषाली चांदोरकर, सुरेखा कुलकर्णी या संस्थेच्या महिला सदस्यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून चारुहास शुक्ल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वासंती जोशी यांनी केले. प्रमुख पाहुणे आणि सत्कार मुर्ती महिलांचा परिचय अनुराधा निलेगावकर आणि भाग्यश्री गोखले यांनी करुन दिला. दरम्यान महिलांसाठी घेतलेल्या मनोरंजनपर खेळांमध्ये वर्षा देशपांडे आणि हेमलता गोडबोले यांनी बक्षिसे पटकावली. सुत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन स्नेहा चिंचवडकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश भट, श्रीनिवास पारखी, राजेंद्र कुलकर्णी, शशांक खांडेकर, सुधाकर कुलकर्णी आदिंनी परीश्रम घेतले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559